# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.02.2025** **वार- शनिवार**

---

**बैठक**

गृह विभागाच्या पश्चिम विभागीय परिषदेची २७ वी बैठक केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली आज पुण्यात झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल तसंच दादरा नगर हवेली आणि दिव दमण या केंद्रशासित प्रदेशातील प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते.

प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातल्या पुणे जिल्ह्यातील लाभार्थ्यांना अमित शहा यांच्या हस्ते आज प्रातिनिधिक स्वरूपात मंजुरी पत्र वितरण करण्यात आलं. पुण्यातील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी इथं झालेल्या या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महाआवास अभियान २०२४-२५ पुस्तिकेचे प्रकाशन आणि पोस्टरचे अनावरण झालं. राज्यातल्या १० लाख लाभार्थ्यांना या योजनेच्या पहिल्या हप्त्याचं वितरण करण्यात आलं.

तत्पूर्वी, सहकारी संस्थांच्या केंद्रीय निबंधक सोसायटीचं देशातील पहिलं क्षेत्रीय कार्यालय पुण्यात सुरू करण्यात येणार आहे, त्याचप्रमाणं देशभरातील सहकारी बँकांना सहकार्य करुन आर्थिक

अडचणीतून बाहेर काढण्यासाठी एक संघटना स्थापन करण्यात आल्याची माहिती केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी आज पुण्यात दिली. जनता सहकारी बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात ते बोलत होते. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<u>शिक्षण</u>**

मुलांमधल्या मूळ, आपसूक गुणांना न्याय देऊन त्याद्वारे त्यांचं व्यक्तिमत्त्व विकसित करणं हे राष्ट्रीय शिक्षण धोरणाचं अत्यंत महत्त्वाचं उद्दिष्ट असल्याचं राज्य शालेय शिक्षण मंत्री डॉक्टर पंकज भोयर यांनी सांगितलं. डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि विद्या भारती यांच्याद्वारे आयोजित पुणे शिक्षण परिषदेचं उद्घाटन करताना ते बोलत होते. राष्ट्रीय शिक्षण धोरणातील राज्य अभ्यासक्रम आराखड्याची सर्वांगीण चर्चा करण्यासाठी ही परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेच्या संयोजनातील प्रमुख घटक असलेल्या विद्या भारती संस्थेचे महाराष्ट्र प्रांत संचालक अरुण कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना, राष्ट्रीय शिक्षण धोरणाची सांगड भारतीयीकरणाच्या प्रक्रियेशी घालण्याची आवश्यकता असल्याचं सांगितलं. परिवर्तन शिक्षणाचे, जागरण भारतीयत्वाचे, या उद्देशानं झालेल्या या परिषदेत, विविध आठ विषयांवरील चर्चासत्रात, एकशे१८ संस्थांच्या ४६३ प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

**<u>पुरस्कार</u>**

पुण्यातील आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी संस्थेच्या ३१ व्या स्थापना दिवसानिमित्त दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार, भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. के. सिवन यांना प्रदान करण्यात येणार आहे. तसंच 'यशस्वी युवा उद्योजक पुरस्कार', २००२ च्या तुकडीचे माजी विद्यार्थी

प्रीतपालसिंग यांना दिला जाणार आहे. परवा चोवीस तारखेला संस्थेच्या दिघी परिसरात हा पुरस्कार वितरण समारंभ होणार आहे.

**<u>जीबीएस</u>**

पुणे शहरात वाढत असलेल्या ‘जीबीएस रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर महापालिकेनं शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या टाक्यांची स्वच्छता करण्याचा निर्णय घेतला होता. गेल्या दहा दिवसांमध्ये महापालिकेनं २५ टाक्यांची स्वच्छता केली असून उर्वरित टाक्यांची स्वच्छता देखील पुढील काही दिवसांमध्ये पूर्ण करण्याचं नियोजन पाणीपुरवठा विभागानं केलं आहे. पुणे शहरात महापालिकेच्या सुमारे १५५ टाक्या आहेत. त्या टाक्यांची स्वच्छता महिनाभरात करण्याचं  महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागानं निश्चित केलं आहे अशी माहिती पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी दिली.

**<u>पेपर</u>**

इयत्ता दहावीची प्रश्नपत्रिका फुटली असल्याचे वृत्त काही वृत्त वाहिन्यांनी प्रसिद्ध केलं होतं परंतु ही प्रश्नपत्रिका फुटली नसल्याचं राज्य मंडळानं अधिकृतपणे जाहीर केलं आहे. मराठी विषयाची प्रश्नपत्रिका काल जालना आणि यवतमाळ याठिकाणी फुटलेली नाही असं मंडळाकडून एक निवेदनाद्वारे कळविण्यात आले आहे, दरम्यान सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले असल्याचंही या निवेदनात म्हटलं आहे.

**<u>प्रदर्शन</u>**

महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या पुण्यातील कृषी महाविद्यालयातर्फे ‘फुले कृषी - २०२५’ प्रदर्शन सहा ते दहा मार्च दरम्यान शिवाजीनगर इथं महाविद्यालयाच्या परिसरात होणार आहे. शेतकऱ्यांना शेतीसाठी निरोगी आणि शाश्वत पद्धती अवलंबण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि साधनांची माहिती देणं, हा या प्रदर्शनाचा उद्देश आहे. या प्रदर्शनात आधुनिक कृषी तंत्रज्ञान, जैविक कृषी पद्धती,

मातीचं आरोग्य व्यवस्थापन आणि रासायनिक तणनाशकांचा आणि कीटकनाशकांचा वापर कमी करणारी पद्धत यांची प्रात्यक्षिकं असतील, अशी माहिती महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉक्टर महानंद मानो यांनी दिली. तसंच शाश्वत शेती, रोग नियंत्रण, कृषी यंत्रं आणि अवजारं, शेतीमधील इंटरनेटचा वापर, कृषी क्षेत्रामधील ड्रोन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, प्रत्यक्ष खरेदी विक्री यावर आधारित विभाग आणि दालनं असतील असं मानो यांनी सांगितलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**